# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यात कृषी पदवीच्या २७ टक्के जागा रिक्त असल्याबाबत

**(१) ८६५ (१४-०४-२०२५) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व खाजगी कृषी महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमांसाठी एकूण १६,७६४ जागा उपलब्ध असून, त्यापैकी ४,५५१ जागा रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी पदवीधर विद्यार्थ्यांसाठी नोकरीच्या संधी कमी होत असतानाही राज्यातील शासकीय व खाजगी कृषी महाविद्यालयांची संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शासकीय व खाजगी कृषी महाविद्यालयांमधील रिक्त जागा भरण्यासाठी तसेच कृषी पदवीधर विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१७-०२-२०२६) :** (१) राज्यात एकूण ४७ शासकीय कृषी संलग्न महाविद्यालये कार्यरत असून १६० खाजगी कृषी/संलग्न महाविद्यालये आहेत. सन २०२४-२५ या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेनुसार शासकीय कृषी महाविद्यालयातील एकूण ९१.५० % जागा भरलेल्या असून ८.५० % जागा रिक्त होत्या.

तसेच, खाजगी कृषी/संलग्न महाविद्यालयातील एकूण ७०.९८ % जागा भरलेल्या असून २९% जागा रिक्त होत्या.

(२) राज्यातील कृषी महाविद्यालयांतील रिक्त जागा व खर्चाचे दायित्व पाहता, नवीन कृषी महाविद्यालय स्थापन करण्याबाबत धोरण तयार करण्याच्या सूचना सर्व कृषी विद्यापीठे व महाराष्ट्र कृषी शिक्षण संशोधन परिषदेस देण्यात आल्या आहेत व तोपर्यंत नवीन कृषी महाविद्यालये स्थापन न करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(३) कृषी पदवी अभ्यासक्रमास प्रवेशीत विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याकरीता, कृषी व संलग्न पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता खुल्या प्रवर्गासाठी असलेली ५०% गुणांची अट शिथील करुन किमान ४५% गुणांची पात्रता निश्चित करण्यात आली आहे.

तसेच, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडील इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरीता कृषी पदवीच्या अभ्यासक्रमाकरीता १० पॉईंट्सचा अधिभार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव शहरातील वाळू माफियांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(२) ९२७ (०९-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहरात वाळू माफियांकडून अवैध वाळूची वाहतूक करताना अनेक निरपराध नागरिक आणि निष्पाप बालकांचे मृत्यू झाल्याची बाब दिनांक २६ डिसेंबर, २०२४ रोजी तसेच कुऱ्हा (ता.मुक्ताईनगर,जि.जळगाव) आणि अंतुर्ली खुर्द (ता.पाचोरा) येथे वाळू माफियांकडून तलाठ्यांना धक्का-बुक्की, दमदाटी करून वाहन पळवून नेत असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वाळू माफियांविरोधात कोणती कारवाई केली तसेच वाळू माफियाविरोधात कायमस्वरूपी मोहीम राबविण्यासाठी तसेच सदर मोहिमेदरम्यान तलाठ्याना आवश्यक पोलीस संरक्षण पुरविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०२-०१-२०२६)** : (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २५ डिसेंबर, २०२४ रोजी जळगाव शहरात रेतीचे रिकामे डंपर व मोटार सायकलचा अपघात होऊन ०९ वर्षाच्या बालकाचा मृत्यू झालेला आहे. याबाबत एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे FIR क्र. ९०७/२०२४ दाखल करण्यात आलेली आहे.

दिनांक १४/०१/२०२५ रोजी मंडळ अधिकारी कुऱ्हा यांच्या पथकास मुक्ताईनगर तालुक्यातील कुऱ्हा मंडळातील वडोदा-सुळे रस्त्यावर अनधिकृत वाळू वाहतूक करताना आढळलेला ट्रॅक्टर पोलीस स्टेशन येथे घेऊन जात असताना चालकाने पळवून नेला असल्याने संबंधित ट्रॅक्टर मालक व वाहक यांचे विरुध्द मुक्ताईनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदर वाहन पोलीस विभागामार्फत जप्त करुन वाहन मालकावर रुपये १२४२३०/- इतक्या दंडात्मक रकमेचा बोजा बसविला आहे.

दिनांक १२/०१/२०२५ रोजी मौजे अंतुर्ली खु. येथे निनावी नंबरचा ट्रॅक्टर अवैध वाळू वाहतूक करताना गस्ती पथकास आढळला असता त्यास पथकातील कर्मचाऱ्यांनी ट्रॅक्टर तहसिल कार्यालय, पाचोरा येथे घेण्यास सांगितले असता पथकातील सदस्यांना वाळूमाफियांनी धक्काबुक्की करुन ट्रॅक्टर पळवून नेला. सदर वाळू माफियाविरोधात पाचोरा पोलीस स्टेशला गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(२) अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तालुकास्तरावर गस्ती पथके नियुक्त करण्यात आहेत. तसेच, दिनांक १७/०७/२०२५ च्या परिपत्रकान्वये अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी फौजदारी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

जळगाव जिल्ह्यात माहे १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत अवैध गौणखनिज उत्खनन करणाऱ्या एकूण ७१९ वाहनांवर कारवाई करुन एकूण रुपये ९.७७/- कोटी एवढया रकमेचा दंड आकारण्यात आला आहे. तसेच ३८ गुन्हे दाखल करुन ३६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच ४ एमपीडीए कायद्याअंतर्गत कारवाया करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या वन जमिनीवरील रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३) ११८४ (०९-०४-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १० मधील प्रश्न क्रमांक ८४५१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या वन जमिनींवर अनेक वर्षांपासून हजारो कुटुंबे वास्तव्यास असून सदर कुटुंबांचे सुयोग्य पुनर्वसन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी राहत असलेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनामार्फत शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१६-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) रिट याचिका क्र.३०५/१९९५ मधील मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार सन २००० साली पहिल्या टप्प्यात पुनर्वसनाकरीता रक्कम भरणा केलेल्या ११६५८ पात्र अतिक्रमकांपैकी ११३५९ अतिक्रमकांचे संघर्ष नगर, चांदिवली येथे पुनर्वसन करण्यात आले आहे. मात्र सदनिकांच्या उपलब्धतेअभावी सन २००८ मध्ये रक्कम भरणा केलेल्या व प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या १३४८६ अतिक्रमकांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्णत्वास जाऊ शकलेली नाही. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

---

## राज्यातील पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबविणेबाबत

**(४) १२३९ (१४-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गावागावांमध्ये शेतरस्ते आणि पाणंद रस्ते तयार करण्यासाठी शासनाने रोजगार हमी आनंद रस्ते योजना सुरू केली असून काही गावांतील शेतकऱ्यांचा पाणंद रस्त्यांना विरोध असल्यामुळे या रस्त्यांच्या निर्मितीत अडथळे येत आहेत तसेच पाणंद रस्ते हे शेतकऱ्यांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे

असूनही महसूल विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने सदर रस्त्याची कामे वर्षानुवर्षे प्रलंबित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणंद रस्ते तयार करण्यासाठी पोलिसांचे संरक्षण मागितल्यास त्याचा खर्च शेतकऱ्यांना स्वतः भरावा लागतो तसेच रस्ते उपलब्ध नसल्याने शेतकरी त्यांचा उत्पादीत शेतमाल बाहेर घेऊन जाऊ शकत नसल्याने जमिनी पडीक राहिल्याने कालांतराने विक्री करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास राज्यातील वहिवाट रस्ते, पाणंद रस्ते (शिवार रस्ते) हे खुले करण्याबाबतची प्रकरणे अनेक दिवसापासून प्रशासनाकडे प्रलंबित असून त्याचे स्थळ निरीक्षण करणे, तात्काळ मोजणी करून सुनावणी घेणे, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पाणंद रस्त्यांच्या अंमलबजावणीसाठी तलाठी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, उपअधीक्षक (भूमी अभिलेख), पोलीस निरीक्षक यांचा समन्वय राखण्यासाठी तसेच राज्यातील शेतकरी आणि गावकरी आर्थिकदृष्ट्या समृध्द व्हावेत यासाठी "मातोश्री पाणंद रस्ते रोजगार हमी योजना" प्रभावीपणे राबवण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (१०-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

१) शासन निर्णय दिनांक ११/११/२०२१ नुसार शेत/पाणंद रस्त्याचे अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस बंदोबस्ताकरीता कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. तसेच, शेत/पाणंद रस्त्यांची मोजणी निशुल्क आहे.

२) महाराजस्व अभियानांतर्गत शेत/पाणंद रस्त्याची अतिक्रमण काढण्याची कार्यवाही मोहीम स्वरुपात राबविण्यात येत आहे.

३) महसूल व वन विभागाच्या दिनांक २९/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गाव नकाशावरील तसेच वहीवाटीचे रस्ते यांवरील अधिसूचना काढून त्यांचे सिंमांकन करण्यास व त्यांना क्रमांक देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) १) शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांकरीता तालुकास्तरीय यंत्रणांमध्ये समन्वयासाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक ११/११/२०२१ अन्वये तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.

२) शेत/पाणंद रस्त्यांची चालू (on going) असलेली कामे भौतिकदृष्ट्या प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत व नवीन कामे सूरू करावीत असे जिल्हास्तरावरील यंत्रणांना शासनस्तरावरुन कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुजारपूर, कासेगाव (जि.सांगली) तसेच शिरोली (जि.कोल्हापूर) येथील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे कायम करणेबाबत

**(५) १२४० (१४-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुजारपूर, कासेगाव (जि.सांगली) तसेच शिरोली (जि.कोल्हापूर) येथील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्याबाबतच्या नोटीसा प्रशासनाने संबंधितांना दिली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे न हटविता ती कायम करण्याचा निर्णय शासनाने माहे फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयानुसार घेतला असताना देखील सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील लोकांना अतिक्रमण हटविण्याबाबत नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अल्पभूधारक शेतकरी तसेच शेतमजुर कामगारांना अतिक्रमणासंदर्भात दिलेल्या नोटीसा रद्द करून वहिवाटीनुसार विनाशुल्क संबंधितांच्या नावावर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१६-०६-२०२६) :** (१) होय.

(२) व (३) गायरान जमिनीवरील अतिक्रमणांबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल सिव्हील अपील क्र.११३२/२०११ @ एसएलपी (सी) ३१०९/२०११ जगपाल सिंग व इतर विरुध्द पंजाब राज्य व इतर या याचिकेवर मा.सर्वोच्च न्यायालयाने, दिनांक २८/०१/२०११ रोजी आदेश पारीत केलेले आहेत. तसेच या अनुषंगाने दिनांक १२/०७/२०११ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल Suo Moto Public Interest Litigation No.०२/२०२२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०६/१०/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार मौजे तुजारपूर, ता.वाळवा, जि.सांगली येथील गायरान जमिनीवरील अतिक्रमण धारकांना अतिक्रमण काढून घेण्याबाबतच्या नोटीसा बजावण्यातआलेल्या आहेत.

तसेच मौजे शिरोली, ता.हातकणंगले (संपूर्ण तालुका), जि.कोल्हापूर येथील गायरान जमिनीवरील निवासी/वाणिज्य/ औद्योगिक शेती व अन्य प्रयोजनार्थ अतिक्रमण केलेल्या अतिक्रमण धारकांना अतिक्रमण काढून घेण्याबाबतच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. तथापि, मौजे कासेगाव, ता.वाळवा, जि.सांगली येथील अतिक्रमण धारकांना अद्यापपर्यंत नोटीसा बजावण्यात आलेल्या नाहीत.

तसेच आता महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २५/०३/२०२६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदींनुसार शासकीय जमिनीवरील दिनांक ०१/०१/२०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लाखनी (जि.भंडारा) तालुक्यातील सर्वच गावांमध्ये विविध प्रवर्गातील अनेक योजनांतर्गत हजारो घरकुलांचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(६) १२७४ (१५-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखनी (जि.भंडारा) तालुक्यात असलेल्या १०४ गावांसह ग्रामीण भागांतील जवळपास सर्वच गावांमध्ये विविध प्रवर्गातील अनेक योजनांतर्गत हजारो घरकुले मंजूर करण्यात आली असून या घरांचे पक्के बांधकाम करण्यासाठी रेती मिळत नसल्याने बांधकाम प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेतीची पर्यायी व्यवस्था करून देण्याची मागणी तालुक्यातील घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांकडून शासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी रेती उपलब्ध करून लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०२-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर बाब निर्दशनास आली नाही.

(३) लाखनी तालुक्यात ग्रामीण भागात दिनांक १/०१/२०२४ ते ३१/०३/२०२५ पर्यंत ३०८ घरकुल लाभार्थ्यांना मोफत ५ ब्रास प्रमाणे १५३८ ब्रास वाळू उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दिनांक ०१/०४/२०२५ ते ०६/०६/२०२५ पर्यंत ४७० घरकुल लार्भाथ्यांना मोफत ५ ब्रास प्रमाणे २३५० ब्रास वाळू उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे दिनांक ०८/०४/२०२५ व ३०/०४/२०२५ वाळू धोरणानुसार १४३८ घरकूल लाभार्थ्यांना मोफत ५ ब्रास प्रमाणे १८३६ ब्रास वाळू उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच शासकीय वाळू डेपोमध्ये उपलब्ध असलेली वाळू घरकुल लार्भाथ्यांना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिहोरा (ता.तुमसर, जि.भंडारा) परिसरात असलेल्या गावांच्या शिवारातून मुरूम चोरीला जात असल्याबाबत

**(७) १२८९ (१४-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिहोरा (ता.तुमसर, जि.भंडारा) परिसरातील चुल्हाड, रनेरा, धनेगाव या गावांच्या शिवारातून मुरूम चोरीला जात असल्यामुळे तेथे मुरूमाच्या खदाणी तयार झाल्या असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतशिवार खोलीकरणाच्या नावाखाली रॉयल्टी न भरता मुरूम उपसा केला जात असल्याचे तसेच या मुरूमाचा वापर पाणंद रस्ते व डांबरीकरणाच्या कामांसाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी लाखो रुपयांचा महसूल बुडत असतानाही महसूल विभागामार्फत यासंदर्भात कोणतीच कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महसूल बुडविणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच सिहोरा (ता.तुमसर, जि.भंडारा) परिसरात होणाऱ्या मुरुम चोरीस आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१६-०६-२०२६) :** (१) तुमसर तालूक्यामधील मौजा धनेगाव येथील भु. क्र. २०९/१ मध्ये अंदाजे ५५ ब्रास तसेच भु. क्र. २४८ मध्ये अंदाजे ६० ब्रास मुरूम उत्खनन झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांविरूध्द रुपये १२,१९,००० इतक्या दंडाचे आदेश पारित करण्यात आलेले आहेत. मौजा धनेगाव येथे अनुक्रमे दिनांक ३१/०१/२०२५, दिनांक ११/०४/२०२५ रोजी अवैधरित्या मुरूम वाहतूक करताना आढळून आल्यावरून संबंधित वाहनमालक यांच्याकडून रुपये ०२,२१,२०० एवढी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) मौजे धनेगाव येथे अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणी आढळून आलेल्या संबंधित व्यक्ती व वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. अवैध गौण खनिजाचे उत्खनन, वाहतूक व साठेबाजीस आळा घालण्यासंबंधाने उमरवाडा व तामसवाडी रेती घाट येथे २४x७ चेक पोस्ट स्थापित करण्यात आलेली असून सदरहू चेकपोस्टवर महसूल विभाग व पोलीस विभागाचे अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

तालुकास्तरावर नायब तहसिलदार यांचे अधिनस्त मंडळ अधिकारी व तलाठी यांचे भरारी पथक स्थापन करण्यात आलेले असून अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्प व चांदोली अभयारण्याच्या पर्यटन वाढीच्यादृष्टीने विकास आराखडा तयार करण्याबाबत

**(८) १३६३ (१५-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात असलेल्या सह्याद्री व्याघ्र प्रकल्प व चांदोली अभयारण्याच्या पर्यटन वाढीच्यादृष्टीने आवश्यक असणाऱ्या सर्व सोयीसुविधा व पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण निसर्गनिर्मित सुविधा व विकास आराखडा तयार करण्याची सूचना स्थानिक लोकप्रतिनिधींनी वन विभागाला केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प व चांदोली अभयारण्यात असलेल्या वेगवेगळया दुर्मिळ वनस्पती, फुले, प्राण्यांचे ठसे, प्राण्यांसाठी असणाऱ्या पाणी साठवण तलावाची पाहणी व उपलब्धता याची माहिती

घेऊन उक्त मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२७-०४-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सह्याद्री व्याघ्र राखीव अंतर्गत निसर्ग पर्यटन आराखडा सन २०२३-२४ ते २०२७-२८ मध्ये समाविष्ट असलेल्या बाबींचा प्रस्ताव तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या परंतु निसर्ग पर्यटन आराखड्यामध्ये समाविष्ट नसलेल्या बाबींचा प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील शाळेच्या क्रीडांगणासाठी दिलेल्या जमिनीतून अवैधरित्या उत्खनन केल्याबाबत

**(९) १५०८ (१५-०४-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येहळेगाव (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) तुकाराम येथे शाळेच्या क्रीडांगणासाठी दिलेल्या जमिनीत उर्ध्व पैनगंगा प्रकल्प येहळेगाव (ता.कळमनुरी) कार्यालयाने ४०० ब्रास मुरुम उत्खनन केल्याची बाब माहे जानेवारी,२०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात महसूल विभागाच्या स्थानिक कार्यालयाने दिलेल्या नोटीशीकडे प्रकल्प कार्यालयाने दुर्लक्ष करून कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे ग्रामस्थांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदर प्रकल्प कार्यालयातील दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मौजे येहळेगाव तु., येथील ग.नं. ९४ मध्ये झालेल्या अवैध उत्खननाच्या अनुषंगाने केलेल्या पंचनाम्यानुसार उपविभागीय अधिकारी, कळमनुरी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) व ४८ (८) च्या तरतुदीनुसार दिनांक २६/०३/२०२५ रोजी उर्ध्व पैनगंगा प्रकल्प कार्यालय क्र.३ यांना रुपये २२,४९,३००/- एवढया रकमेचे दंडात्मक आदेश पारित केले असून दंडाच्या वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

त्याचप्रमाणे मौजे येहळेगाव तु. येथील ग्रामस्थांनी क्रिडांगणासाठी प्रस्तावित जागेवर पडलेला खड्डा बुजून देण्याची विनंती केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) तालुक्यातील स्थलांतरीत गावांच्या नोंदी भूमी अभिलेख विभागाकडे मिळत नसल्याबाबत

**(१०) १५६२ (१५-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) तालुक्यातील रिगाव, कोन्हाळा, पिप्राळा, घोडसगाव, नांदवेल, महालखेडा, थेरोळा, बोदवड, निमखेडी बु, इच्छापूर व मुक्ताईनगर या नदी काठावरील गावांचे सन १९५९ मध्ये आलेल्या महापुरामुळे स्थलांतरण करण्यात आले असूनही भूमी अभिलेख विभागाकडे याबाबतच्या नोंदी उपलब्ध नाहीत तसेच संबंधितांना सातबारा उताराही मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त स्थलांतरीत करण्यात आलेल्या गावातील घरांची भूमी अभिलेख विभागाकडे नोंद करून सातबारा उतारे व नागरी सुविधा देणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) (१९-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे. मुक्ताईनगर तालुक्यातील रिगाव, कोन्हाळा, पिप्राळा, घोडसगाव, नांदवेल, महालखेडा, थेरोळा, बोदवड, निमखेडी बु. इच्छापूर व मुक्ताईनगर या गावांचे शेती/ गावठाणाचे सातबारा उपलब्ध आहेत.

(२) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण२०१८/ प्र.क्र.१३/ मातंक, दिनांक २२/०२/२०१९ व ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.स्वामित्व २०२०/ प्र.क्र.८८/पंरा४, दिनांक ०४/०२/२०२१ अन्वये राज्यातील सर्व गावठाणाचा ड्रोनद्वारे मोजमाप सर्व्हे करुन सर्व मिळकतदारांना त्यांचे कायदेशीर सनद/ मिळकत पत्रिका (प्रॉपर्टीकार्ड) उपलब्ध करुन देण्याबाबत स्वामित्व योजनेतंर्गत कार्यवाही करण्यात येत आहे. मुक्ताईनगर तालुक्यातील रिगाव, कोन्हाळा, पिप्राळा, घोडसगाव, नांदवेल, महालखेडा, थेरोळा, बोदवड, निमखेडी बु. व इच्छापूर या गावातील मिळकतधारकांना स्वामित्व योजनेच्या माध्यमातून कायदेशीर सनद/ मिळकत पत्रिका (प्रॉपर्टीकार्ड) वाटप करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये वाघाचा मृत्यू झाल्याबाबत

**(११) १६४४ (१४-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमधील शिवनी वनपरिक्षेत्रात वाघ मृतावस्थेत आढळल्याची माहिती दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमधील शिवनी वनपरिक्षेत्रात घडलेल्या घटनेबाबत वनविभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१६-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

या प्रकल्पांतर्गत बफर विभागातील शिवणी वनपरिक्षेत्राअंतर्गत पांगडी-३ नियतक्षेत्रात कक्ष क्रमांक-३२१ मध्ये दिनांक २०/०१/२०२५ रोजी झालेला वाघाचा मृत्यू नैसर्गिक असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

सदर मृत वाघाचे संपूर्ण अवयव सुरक्षित होते, घटना स्थळाची आजुबाजुला पाहणी केली असता, कुठेही संशयास्पद आढळून आले नाही. पंचनाम्यानुसार मृत वाघाच्या डोक्यावरील जखमेतून सदर वाघाचे अन्य हिंस्त्र वन्यप्राण्यांसोबत झुंज झाली असावी व नंतर त्याचे मृत्यू झाला असावा असे दिसून येते. तसेच शवविच्छेदन अहवालानुसार सदर वन्यप्राण्याची जखम चिघळुन त्यात मोठ्या प्रमाणावर Maggots झाल्याने संक्रमणाने मृत्यू झाल्याची शक्यता आहे.

सदर मृत वाघाचा संपूर्ण अंतिम अहवाल दिनांक ०७/०२/२०२५ अन्वये राष्ट्रीय व्याघ्र प्राधिकरण, नवी दिल्ली यांना सादर करण्यात आलेला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मच्छिमारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१२) १६७९ (०९-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीच्या शिष्टमंडळाने मा.मत्स्यव्सवसाय मंत्री यांच्याकडे मच्छिमारांच्या प्रलंबित प्रश्नाबाबतचे निवेदन दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे ताडदेव येथील बेलासिस अपार्टमेंट बांधकामामुळे बाधित होणाऱ्या मासळी विक्रेत्या कोळी महिलांचे ताडदेवमध्येच पुनर्वसन करणे, पालघर जिल्ह्यातील एमआयडीसीमुळे बुजविण्यात आलेल्या खाड्या पुनर्जीवित करणे, कोळीवाड्यातील राहत्या घराच्या जमिनी मच्छिमाराच्या नावे करणे, पावसाळयातील अवैध मासेमारीवर आळा घालण्यासाठी सुरक्षा यंत्रणांची समन्वय समिती गठीत करुन अवैध पर्ससीन नेट आणि एलईडी लाइट मासेमारी रोखणे, मच्छिमारांची कर्ज माफी करुन वाढवण बंदर कायमचे रद्द करणे इत्यादी मागण्या समितीने आपल्या निवेदनाद्वारे सादर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी निवेदनाद्वारे सादर केलेल्या मागण्या पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे (०५-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुंबई मधील ताडदेव येथे बेलासिस ब्रीज येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बेलासिस अपार्टमेंटचे

बांधकाम करण्यात आलेले आहे. या जागेवर मासळी विक्री करणाऱ्या मासळी विक्रेत्या महिलांचे ताडदेव येथेच पुनर्वसन करण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

पालघर जिल्ह्यातील तारापुर एमआयडीसी मधील रासायनिक कंपन्यांमधून अनियंत्रित व शुद्धिकरण न करता रासायनिक सांडपाणी मुरबे, सातपाटी व नावापुर, दांडी या खाड्यांमध्ये प्रदूषित पाणी सोडले जात असल्याबाबत उपाययोजना, करण्यासाठी जिल्हाधिकारी, पालघर यांचे कार्यालयात, परिसरातील गावांचे लोकप्रतिनिधी व सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक दिनांक ११/०३/२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. बैठकीत जिल्हाधिकारी, पालघर यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ च्या MPCB व MIDC अधिकाऱ्यांना दोषी वर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. मासळी साठ्याचे जतन तसेच मच्छीमारांची जीवित व वित्त यांचे रक्षण या हेतुने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमन, १९८१ च्या कलम ४ च्या पोट कलम (१) व्दारे दिनांक ०१ जून ते दिनांक ३१ जुलै (दोन्ही दिवस धरुन राज्याच्या जलधी क्षेत्रात यांत्रिक मासेमारी नौकांस पावसाळी मासेमारी बंदी घालण्यात आलेली आहे.

कृषी व पदुम विभाग, शासन अधिसूचना दिनांक २७/०४/२०१८ व दिनांक १०/०८/२०२२ शासन आदेशान्वये अवैध पर्ससीन व एलईडीच्या मासेमारीवर निर्बंध घालण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महसूल विभागांतर्गत उपजिल्हाधिकारी संवर्गातील ज्येष्ठता यादीतील संचिकेच्या त्रुटी पूर्तता करण्याबाबत

**(१३) १७४७ (१५-०४-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागांतर्गत उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी यांच्या दिनांक ०१/०१/२००७ ते ३१/१२/२०१२ या कालावधीची सुधारीत प्रारूप ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यासाठी संचिका क्र. ०१२३/प्र.क्र. ३६/ई-२ बाबत तत्कालीन महसूल मंत्री यांनी दिनांक २१/०८/२०२४ रोजी त्रुटी पूर्तता करण्याचे निर्देश दिले असतानाही सदर आदेशांचे पालन न करता नवीन संचिका सादर करून विद्यमान महसूल मंत्री यांच्या मान्यतेने अंतिम ज्येष्ठता यादीस मंजुरी देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी त्रुटी पूर्तता न करता आणि तत्कालीन महसूल मंत्री यांचे निर्देश विद्यमान महसूल मंत्री यांना अवगत न करता त्यांची दिशाभूल करून सुधारीत संचिका सादर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने याचिका क्र. ५२६/२००४ अन्वये दिनांक १७/०४/२००८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार संचिका क्र. एस.एन.टी.-२०१४/प्र.क्र. ८ (भाग-१)/ई-१अ/मुमंस क्र. ४४४/२०१९ वर कार्यवाही करण्याचे निर्देश तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दिनांक २८/०३/२०१९ रोजी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आदेशांनुसार कार्यवाही न करता संचिका क्र. ९७/२०२० नव्याने सादर करून तत्कालीन महसूल मंत्री यांची मान्यता घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नव्याने संचिका सादर करून तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने तसेच मूळ संचिकेवरील आदेशाची पुनर्स्थापना करून त्रुटी पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०३-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सामान्य प्रशासन विभाग आणि विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार जेष्ठता यादी अंतिम करण्याची कार्यवाही करावी असे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोंदिया जिल्ह्यात सर्व घरकुल लाभार्थ्यांना रेती देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(१४) १७७२ (१४-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यातील सर्व घरकुल लाभार्थ्यांना महसूल विभागाकडून प्रति लाभार्थी निर्णय होऊनही अनेक वर्षे झाली तरी त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे लाभार्थ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील तीन ते चार वर्षांपासून रेतीघाटांच्या लिलाव प्रक्रिया न झाल्याने लाभार्थ्यांना प्रतिट्रॅक्टर रेतीसाठी ₹ ५००० इतका अतिरिक्त खर्च करावा लागत असून गोंदिया जिल्ह्यात ३३ हून अधिक रेतीघाट अस्तित्वात असतानाही लिलाव प्रक्रिया प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रेती लिलाव प्रक्रिया लवकर होण्याच्यादृष्टीने तसेच जिल्ह्यातील सर्व घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास रेती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०२-०१-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलासाठी वाळू डेपोतून विनामुल्य वाळू उपलब्ध करुन देण्याची तरतूद सर्वंकष वाळू/रेती निर्गती धोरण दिनांक १९/०४/२०२३ मध्ये केली होती. सदर धोरणामध्ये सुधारणा करुन दिनांक १६/०२/२०२४ रोजी सुधारित धोरण निर्गमित केले होते.

दिनांक १९/०४/२०२३ च्या धोरणानुसार गोंदिया जिल्ह्यात ०५ वाळू डेपो (१८ घाट) मंजूर केले असून त्यामधून घरकूल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन दिली आहे. तसेच, दिनांक १६/०२/२०२४ च्या धोरणानुसार ०९ वाळू डेपो (२८ वाळू घाट) कार्यान्वित करण्यात आले असून त्यामध्ये जमा होणाऱ्या वाळू पैकी २०% रेतीसाठा ३१,४२१ ब्रास घरकुल योजनेकरीता राखीव ठेवण्यात आला आहे.

तसेच, मौजा पिपरी, ता.सडक अर्जुनी येथील पर्यावरण अनुमती प्राप्त रेतीघाटावरील १०६० ब्रास रेतीसाठा घरकुल योजनेकरीता उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक १९/०४/२०२३ नुसार वाळू डेपो ई-निविदेबाबतची कार्यपध्दती असून गोंदिया जिल्ह्यातील कोणत्याही ट्रॅक्टर धारकांकडून प्रति ट्रॅक्टर ५०००/- अतिरिक्त खर्चाबाबतचा आक्षेप/तक्रार/निवेदने प्राप्त झाली नाही.

शासन निर्णय दिनांक ३०/०४/२०२५ मधील तरतुदीनुसार स्थानिक वापरासाठी राखीव ठेवलेल्या वाळू गटामधून गोंदिया तालुक्यात ४१३७ ब्रास, तिरोडा तालुक्यात एकूण २७५० ब्रास, सडका अर्जुनी तालुक्यात ६२८ ब्रास, अशी एकूण ७,५१५ ब्रास वाळू घरकूल लार्भार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच तालुकास्तरावरील स्थानिक वापरासाठी आणि घरकुल लाभार्थ्यांच्या मागणीनुसार बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु असून सदर शासन निर्णयातील तरतुदींचे काटेकोरपणे अंमलबजावणी क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात होणाऱ्या रकमेची पावती देण्याबाबत

**(१५) १८३१ (१४-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागातील अनुदानित आश्रमशाळांमधील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त केलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना डीसीपीएस ही निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेमार्फत कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कर्मचारी हिस्सा म्हणून १० टक्के रक्कम कपात करण्यात येत असून, त्यात १४ टक्के हिस्सा शासन जमा करत असून याबाबतचा कोणताही हिशोब अथवा पावती कर्मचाऱ्यांना देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर योजनेतील रक्कम नेमकी कुठे जमा असून त्यावर किती टक्के व्याज मिळत आहे, याबाबतची नोंदी ठेवणारी यंत्रणा आदिवासी प्रकल्प कार्यालय अथवा अपर आयुक्त कार्यालय उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या समकक्ष असणारे इतर राज्य शासकीय कर्मचारी उदा. निमशासकीय, जिल्हा परिषद व खाजगी अनुदानित शाळातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनातून कपात केल्या जाण्याऱ्या रकमेचा हिशोब मिळतो, परंतु आदिवासी विकास विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सदरील हिशोब मिळत नसल्यामुळे शासनाच्या कामकाजाविषयी असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आदिवासी विकास विभागातील अनुदानित आश्रम शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना इतर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे डीसीपीएस रकमेचा हिशोब देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके (०२-०३-२०२६) :** (१) आदिवासी विकास विभागाअंतर्गत अनुदानित आश्रमशाळांमधील दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक २२/११/२०१२ च्या शासन निर्णयान्वये, परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत एकूण ६६८९ कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू आहे.
(२) सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कर्मचारी हिश्श्याची रक्कम कपात करण्यात येत असून त्यामध्ये शासन हिस्सा शासन जमा करत असून त्याबाबतच्या हिशोब पावत्या कर्मचाऱ्यांना अदा करण्यात येतात.
(३), (४) व (५) अनुदानित आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांना राज्याची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू असणाऱ्या कर्मचाऱ्यांना तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) लागू करण्यासंदर्भात शासन निर्णय दिनांक १३/०१/२०२६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने NSDL (National Securities Depository Limited) सोबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे कार्यालयाकडून करारनामा करण्यात येणार आहे. तद्नंतर आश्रमशालार्थ पोर्टल आणि NSDL (National Securities Depository Limited) सह तांत्रिक एकीकरण झाल्यानंतर अनुदानित आश्रम शाळेतील प्रत्येक कर्मचारी यांचा DCPS मधील रकमांचा ताळमेळ घेवून त्यांना NPS अंशदायी निवृत्तीवेतन योजना खाते सूरु होण्याची कार्यवाही पूर्ण होणार आहे. कर्मचाऱ्यांचा NPS हिशोब त्यांना शालार्थ प्रणाली मध्ये ऑनलाईन पाहता येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाने ५० टक्के सहभागातील असलेल्या रेल्वे प्रकल्पांमध्ये कव्हर गुड शेड सहित खतांचे रेक पॉईंट प्रस्तावित करण्याबाबत

**(१६) १९२१ (१५-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने ५० टक्के आर्थिक सहभाग केलेल्या रेल्वे प्रकल्पांमध्ये कव्हर गुड शेड सहित खतांचे रेक पॉईंट प्रस्तावित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे निवेदन सादर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१५-०२-२०२६) :** (१) होय.
(२) राज्य शासनाने ५० टक्के आर्थिक सहभाग देऊ केलेल्या रेल्वे प्रकल्पांमध्ये कव्हर गुड शेड सहित खतांचे रेक पॉईंट प्रस्तावित करण्याबाबत कृषी आयुक्तालयाने दिनांक ०५/११/२०२४ च्या पत्रान्वये कृषी विकास अधिकारी (सर्व) यांना जिल्हाधिकारी यांचेमार्फत रेल्वे व्यवस्थापक कार्यालयास त्वरित प्रस्ताव सादर करण्याचे कळवून विभागीय कृषी सह संचालक (सर्व) व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (सर्व) यांनाही आवश्यक कार्यवाहीसाठी अवगत करण्यात आले होत्या.

राज्यात ७ नवीन रेक पॉईंट सुरु करणे व सध्या कार्यान्वित असणाऱ्या १३ रेक पॉईंट वर मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत मा तत्कालीन प्रधान सचिव यांच्या दिनांक २१/०५/२०२४ च्या व

आयुक्त (कृषी) यांच्या दिनांक ०६/०६/२०२५ च्या व वेळोवेळी विविध पत्रान्वये रेल्वे विभागास विंनती करण्यात आली आहे. तसेच कृषी आयुक्तालयाकडून दिनांक १९/०९/२०२५ च्या पत्रान्वये केंद्रीय खत विभागास कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर या कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाची चौकशी करण्याबाबत

**(१७) १९९२ (१४-०४-२०२५) श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर या नवीन इमारतीत गळती लागल्याने कंत्राटदाराकडून सदर इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याचे व प्रकल्प अधिकारी यांनी निकृष्ट बांधकामाबाबत तक्रार करूनही संबंधित कंत्राटदारावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर या इमारतीचे निकृष्ट बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारावर तसेच या प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३)) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके (२७-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) करारनाम्यातील कलम-२० मध्ये सदर इमारतीचा दोष निवारण कालावधी १० वर्षाचा असून, त्यानुसार सदर इमारतीसंबंधी उद्भवलेल्या त्रुटींची पूर्तता संबंधित कंत्राटदारामार्फत करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नंदुरबार जिल्ह्यात बिबट्याच्या हल्ल्यात ९ जणांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१८) २०३५ (१५-०४-२०२५) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुजरात वन विभागाने १९ जानेवारी, २०२५ किंवा त्यापूर्वी नर्मदा नदीच्या मार्गाने बोटीतून महाराष्ट्राच्या हद्दीत बिबट्या आणून सोडल्याचा प्रकार घडला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुजरात राज्याच्या सीमेजवळ असलेल्या नंदुरबार जिल्ह्यात अनेक गावांमध्ये सध्या बिबट्याची दहशत पसरली असून जिल्ह्यातील ९ जणांचा बळी घेतल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यातील बिबट्याला जेरबंद करुन अभयारण्यात सोडण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२२-०६-२०२६) :** (१) दिनांक १७/०१/२०२५ रोजी मणिबेली, ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार येथे वनक्षेत्र गोरा केवडीया वनविभाग गुजरात राज्य वनकर्मचारी हे नर्मदा विकास विभाग यांच्या बार्जने जेरबंद बिबट घेऊन सायंकाळी थांबले असता, घटनास्थळावर उपस्थित असलेल्या स्थानिक गावकऱ्यांनी विरोध केल्याने सदर जेरबंद बिबट माथेसर गुजरात राज्य येथील नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आल्याचे सदर वनअधिकाऱ्यांनी सांगितले आहे,
(२) मेवासी वनविभागाचे क्षेत्र हे तळोदा व अक्कलकुवा या दोन तालुक्यात येत असून मेवासी वनविभागाच्या हद्दीत सन २०२४-२५ मध्ये बिबट्याच्या हल्यात ९ मनुष्य मृत्यूचा घटना घडलेल्या आहेत,
(३) बिबट जेरबंद करणेबाबतच्या प्रस्तावास मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांची मंजूरी प्राप्त झाल्याने मेवासी वनविभागातील मौजे-सरदारनगर गट नं. ११८ शेतशिवार ता.तळोदा, जि.नंदुरबार येथे बिबट जेरबंद करुन त्यास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील नेरूळचे डिपीएस आणि टीएस चाणक्य परिसरातील पाणथळ जमीन ‘संरक्षित क्षेत्र’ म्हणून जतन करण्याबाबत

**(१९) २१३० (१५-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील नेरूळ डिपीएस आणि टीएस चाणक्य परिसरातील ३५.५५ हेक्टर पाणथळ जमीन ‘संरक्षित क्षेत्र’ म्हणून जतन करण्याची शिफारस तत्कालीन वने मंत्री यांनी नेमलेल्या उच्चस्तरीय समितीने राज्य शासनास केली असल्याची बाब दिनांक ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीने केलेल्या शिफारसीचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, सदर शिफारसींची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१६-०२-२०२६) :** (१) नवी मुंबईतील नेरूळ येथील फ्लेमिंगो पक्ष्यांचा नैसर्गिक अधिवास आणि कांदळवनाचे संरक्षण करण्यासाठी तसेच डिपीएस तलावाच्या संरक्षणाबाबत दिनांक ०५/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिति गठीत करण्यात आली होती. टीएस चाणक्य परिसर वरील नमुद समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.
(२) सदर समितीने केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरुप पुढीलप्रमाणे आहे:

अ) सदर समितीने बी.एन. एच. एस. या संस्थेला डि.पी.एस. तलावाचे फ्लेमिंगो पक्ष्यांकरीता असलेले महत्वाचा अहवाल कांदळवन कक्षास सादर करण्याचे निर्देश दिले.

ब) बी.एन. एच. एस. या संस्थेने सादर केलेला अहवाल कांदळवन कक्षाने भारतीय वन्यजीव संस्थान, डेहराडून यांना सादर करून त्यांचे अभिप्राय घ्यावे.

क) सदर अहवालाबाबतीत भारतीय वन्यजीव संस्थान, डेहराडून चा अभिप्राय बी.एन. एच. एस. या संस्थेशी संलग्न असल्यास कांदळवन कक्षाने डिपीएस तलावाचे संरक्षण करण्यासाठी डिपीएस तलावाला Conservation Reserve घोषित करण्यासाठी प्रस्ताव तयार करून शासनास सादर करावा.

ड) सद्य:स्थित डि.पी.एस. तलावात होणारा खाडीच्या पाण्याचा प्रवाह अबाधित ठेवावा.

(३) सदर समितीने बी.एन.एच.एस. या संस्थेने डि.पी.एस. तलावाचे फ्लेमिंगो पक्ष्यांकरीता असलेले महत्व या बाबतचा अहवाल कांदळवन कक्ष यांचेकडे सादर केला आहे. या अहवालात बी.एन.एच.एस. संस्थेने डि.पी.एस. तलावाला संवर्धन राखीव क्षेत्र करण्याची शिफारस केली आहे. त्यानंतर सदरचा अहवाल कांदळवन कक्षाने भारतीय वन्यजीव संस्थान, डेहराडून यांचे अभिप्राय मिळणेकामी सादर केला होता.सदर अहवालाबाबत भारतीच वन्यजीव संस्थान यांनी स्थलांतरीत पक्ष्यांच्या संवर्धनासाठी डि.पी.एस. तलावाचे योग्य ते व्यवस्थापन करण्याची शिफारस केलेली आहे. त्याअनुषंगाने कांदळवन कक्षाने डि.पी.एस. तलावाचे संवर्धन राखीव क्षेत्र करणेबाबतचा प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना दिनांक १९/०३/२०२५ रोजी सादर केला आहे. सदर प्रस्ताव वन्यजीव मंडळाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. सदर बैठकीत मंडळाने “All members unanimously agreed to notify the area as Conservation Reserve” असा निर्णय दिलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## टिपेश्वर (जि.यवतमाळ) अभयारण्यातून होणारे वाघांचे स्थलांतर रोखण्याबाबत

**(२०) २१४६ (१५-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिपेश्वर (जि.यवतमाळ) अभयारण्यातून होणारे वाघांचे स्थलांतर रोखण्यासाठी तयार करण्यात आलेला व्याघ्र प्रकल्पाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टिपेश्वर अभयारण्यातून आतापर्यंत ५ ते ७ वाघांना तेलंगणा, कर्नाटक, छत्तीसगड, बुलढाणा, चंद्रपूर या भागात स्थलांतर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टिपेश्वर अभयारण्य परिसरात व्याघ्र प्रकल्प उभारण्याच्या प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याबाबत तसेच वाघांचे स्थलांतर रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२२-०६-२०२६) :** (१), (२), (३) व (४) टिपेश्वर अभयारण्याला व्याघ प्रकल्प जाहीर करण्याचा प्रस्तावास प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी खालील त्रुटींची पुर्तता करण्याकरीता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांना परत केला आहे.

“The private land of villages declared as Sanctuary” या शिर्षकांतर्गत पुढील बाब नमुद आहे. “However, there are private areas of pitapungari, Rudha, Sukali, Dongergaon and Generi villages, inside the sanctuary of which enquiry are not yet

carried out. It is thus proposed that the S.D.O. Revenue, Kelapur shall carry out the enquiry proceedings in regard to these private areas, on priority basis to determine rights of these villagers statements showing private agriculture land involved in the Tipeshwar Wildlife Sanctuary."

उपरोक्त मुद्याच्या अनुषंगाने खाजगी/महसूल जमीन क्षेत्राचा ताळमेळ बाबत चौकशी करण्यासाठी विभागीय वन अधिकारी, वन्यजीव विभाग, पांढरकवडा यांनी दिनांक ११/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये उप विभागीय अधिकारी, महसूल विभाग, पांढरकवडा यांना खाजगी क्षेत्राचे क्षेत्रफळाबाबत चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. परंतु, चौकशी अहवाल अप्राप्त आहे.

टिपेश्वर अभयारण्यातून सन २०१९ या वर्षी १ वाघाला स्थलांतरीत केले आहे. सन २०२१ या वर्षी २ वाघांना स्थलांतरीत केले आहे व सन २०२३ या वर्षी १ वाघाला स्थलांतरीत केले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.